**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** भोईवाडा
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0345  **Year (वर्ष):** 2026
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/08/2026 03:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरम्यानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 18/08/2026
      **Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/08/2026
      **Time From (वेळेपासून):** 18:00 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

   **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 19/08/2026  **Time (वेळ):** 15:30 बजे

   **(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 003
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/08/2026 02:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पश्चिम, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** कारीवली पोलीस चौकी, कारीवली रोड,भिवंडी

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. मनोज हरिश्चंद्र गोडसे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रूम नं 24, बिल्डिंग क्र 1, ,पोलीस अधिकारी वसाहत,कार्टर रोड, वांद्रे प, मुंबई,भोईवाडा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रूम नं 24, बिल्डिंग क्र 1, ,पोलीस अधिकारी वसाहत,कार्टर रोड, वांद्रे प, मुंबई,भोईवाडा,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9821737379

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र कृष्णा पवार | | | 1. 11/12, बिल्डिंग नं,एल जरी मरी पोलीस ,लाईन सिव्हिल हस्पिटल समोर ,ठाणे पश्चिम , ठाणे,भोईवाडा,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सिम कार्ड ( मोबाइल फोन मधील ) | 08 जीबी क्षमतेचे सनडिक्स कंपनीचे मायक्रो एस.डी.कार्ड क्र 2506DTEKV0CF कि.रु 00/ | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सिम कार्ड ( मोबाइल फोन मधील ) | मेमरीकार्ड 08 जीबी क्षमतेचे सनडिक्स कंपनीचे मायक्रो एस.डी.कार्ड क्र. 5234DTET517Wकि.रु.00/ | 0.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सिम कार्ड ( मोबाइल फोन मधील ) | OPPO कंपनीचा मोबाईल Reno 11 PRO 5G , त्यात जिओ कंपनीचे 9821214340 क्रमांकाचे सिमकाड असलेला कि.र | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम रू. 30,000/ (त्यामध्ये रू.500/ दराच्या भारतीय चलनाच्या 60 नोटा) | 30,000.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अंगझडतीमध्ये मिळून आलेल्या रु. 500/ दराच्या 36 भारतीय चलनी नोटा एकुण रक्कम रु. 18,000/ | 18,000.00 |
| 6 | इतर | घरगुती वस्तु | राजेंद्र कष्णा पवार यांनी परिधान केलेली अँन्थ्राँसीन पावडरची चकाकी असलेली राखाडी रंगाची जिन्स पन्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

48,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

जबाब दि. 20/08/2026

श्री. मनोज हरिंष्चद्र गोडसे, वय- 45 वर्षे, धंदाः- नोकरी, ( पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबधक विभाग, मुंबई, वरळी ), रा.ठी.-रूम नं. 24, बिल्डिंग क्र. 1, पोलीस अधिकारी वसाहत, कार्टर रोड, वांद्रे (प), मुंबई. मो.नं. 9821737379.

मी वरीलप्रमाणे असून नमूद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहावयास आहे. मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, मुंबई विभाग येथे दि. 07/10/2025 रोजी पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनाक 19/08/2026 रोजी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात कर्तव्यावर असताना मा. सहायक पोलीस आयुक्त, प्रषासन, लाप्रवि, मुंबई यांनी मला व सपोआ संदिप बडगुजर यांना बोलावून तक्रारदार इसम नामे श्री. शफीक असलम अन्सारी यांची ओळख करून दिली. तसेच मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे श्री. शफीक अन्सारी यांचे तक्रारीच्या अनुशंगाने माझी तपासी अधिकारी व सपोआ बडगुजर यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नेमणूक करून पुढील कारवाई करण्याचे आदेशित केले.

पोलीस स्टेशन भिवंडी



Scanned with OKEN Scanner

मी आणि सपोआ संदिप बडगुजर यांनी तक्रारदार श्री. शफीक अन्सारी यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी माहिती दिली की, त्यांचे पुर्ण नाव शफीक असलम अन्सारी, वय 33 वर्षे, रा.ठी. घर नं. 298/2/441जी/1, न्यु प्रकाश नगर, पटेल कंपाउंड, 4 थी गल्ली, धामणकर नाका, भिंवडी, ठाणे-421302 असे आहे. ते गेल्या 02 महिंन्यापासून भंगार साहित्य खरेदी विक्री करण्याचा व्यवसाय करीत आहेत. दि. 10/08/2026 रोजी ते धामणकर नाका येथील एका भंगार विक्री करणा-याकडून लोखंडाचे भंगार साहित्य रोखीने विकत घेवुन भाडयाने टेम्पोमध्ये टाकुन घेवून जात होते. त्यावेळी रोशनबाग मस्जीद जवळ एका साध्या कपडयातील इसमाने टेम्पो थांबवून तो पोलीस असल्याचे सांगून त्यांचेकडे भंगार साहित्याचे बिलाची मागणी केली. त्यांचेकडे बिल नसल्याचे सांगितले असता त्याने 10,000/- रूपये दिल्याशिवाय वाहन सोडणार नाही असे सांगितले. त्यावेळी शफीक अन्सारी याने त्यांचेकडे असलेले रोख 10,000/- त्याला दिले. त्यानंतर त्या इसमाने त्यास भंगाराचा व्यवसाय चालू ठेवायचा असल्यास भोईवाडा पोलीस ठाणे, भिंवडी, ठाणे चे पोलीस नामे पवार यांना त्यांचे मोबाईल क्र. 9821214340 वर कॉल करून भेटण्यास सांगितले आणि तो निघून गेला.

दिनाक 18/08/2026 रोजी दुपारी 01.54 वाजता षफीक अन्सारी याने त्यांचे मोबाईल क्र. 9307851182 वरून मोबईल क्रमांक 9821214340 वर व्हाॅटसअॅप वरून व्हाईस काॅल करून ते भोईवाडा पोलीस ठाणेचे पवार साहेब आहेत का ? अशी विचारणा केली. त्यावर त्यांनी होकार दिला असता तक्रारदाराने त्यांना सांगितले की, गेल्या आठवडयात एका साध्या कपडयातील पोलीसाने त्यांची गाडी पकडून त्यांना धंदा चालू ठेवायचा असल्यास तुमची भेट घेण्यास सांगितले आहे. त्यावेळी त्यांनी ते भिंवडी कोर्टात जात असल्याचे सांगुन संध्याकाळी तेथे भेटण्यास सांगितले. शफीक अन्सारी यांनी संध्याकाळी पुन्हा 05.48 वाजता व्हाॅटसअॅपवरून श्री. पवार यांना व्हाईस काॅल केला असता त्यांनी शफीक अन्सारी यास भिंवडी कोर्टात येण्यास सांगितले. शफीक अन्सारी हे भिंवडी कोर्टात गेल्यावर त्यांनी श्री. पवार यांना व्हाॅटसअॅपवरून काॅल करून भेट घेतली. त्यावेळी श्री. पवार यांनी त्यांना काम असल्याचे सांगून नंतर भोईवाडा पोलीस ठाणेस येण्यास सांगितले.

त्यानंतर शफीक अन्सारी यांनी भोईवाडा पोलीस ठाणे येथे जाऊन 06.54 वाजता व्हाॅटसअॅपवरून व्हाईस काॅल केला. त्यावेळी श्री. पवार हे पोलीस ठाणेचे बाहेर आले आणि त्यांनी ते पोलीस ठाणेचे सिनीअर साहेबांकडे काम करीत असल्याचे सांगुन भंगार खरेदीविक्रीचा धंदा चालू ठेवायचा असल्यास प्रत्येक महिन्याला सिनीअर साहेबांकरीता 30,000/- रूपये आणि त्यांच्या स्वतःकरीता 5,000/- असे एकुण 35,000/- रूपये दिल्यास धंदा करायला काही प्राॅब्लेम येणार नाही असे बोलून पैसे घेवून येण्यास सांगितले आहे. श्री. पवार यांच्या मोबाईल क्रमांक 9821214340 चे व्हाॅटसअॅपवरील प्रोफाईल फोटो हा त्यांचाच असून प्रोफाईल नाव राजेंद्र पवार असे दिसत असल्याचे शफीक अन्सारी यांनी सांगितले. श्री. शफीक अन्सारी यांना भिंवडी येथील भोईवाडा पोलीस ठाणेचे पोलीस श्री. राजेंद्र पवार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने ते दिंनाक 19/08/2026 रोजी त्यांचा मित्र श्री. प्रेम बचुटे याच्यासोबत लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, मुंबई येथे तक्रार देणेसाठी आले.

तक्रारदार श्री. शफीक असलम अन्सारी यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे त्यांना त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरात लेखी अर्ज देण्यास सांगितला असता त्यांनी स्वहस्ताक्षरात सविस्तर अर्ज लिहून तो अर्ज माझे ताब्यात दिला. त्यानंतर मी लाप्रवि कार्यालयाचे पोह. शेमडकर यांना दोन पंचांना बोलाविण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच नामे पंच 1) श्री. मयुर ज्ञानेश्वर चैखंडे, वय 33 वर्षे, नोकरी- लिपीक टंकलेखक, प्रादेशिक परीवहन कार्यालय, बोरीवली आणि पंच 2) श्री. विरधवल लक्ष्मण जाधव, वय 55 वर्षे, नोकरी-सहकार अधिकारी, उपनिंबधक सहकारी संस्था,के/पुर्व विभाग, गुंदवली, अंधेरी (पु), मुंबई-69 हे सायंकाळी 17.00 वा. सुमारास लाप्रवि कार्यालयात हजर झाले. दोन्ही पंचांना मी तक्रारदार श्री. शफीक अन्सारी यांची ओळख करून दिली. पंचांनी तक्रारदार याचेकडे तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा केली असता, तक्रारदार यांनी वरीलप्रमाणे माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी लिहून दिलेला अर्ज दोन्ही पंचांना वाचण्याकरीता दिला असता त्यातील मजकुर व तक्रारदार श्री. शफीक अन्सारी यांनी समक्ष सांगितलेली हकीकत एकच असल्याची पंचांची खात्री झाली. तक्रारदार यांच्या लेखी अजावर तकारदार श्री. शफीक अन्सारी यांनी स्वाक्षरी केल्यानंतर मी आणि स.पो.आ. बडगुजर तसेच दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर मी, सपोआ बडगुजर, दोन्ही पंच व तक्रारदार शफीक अन्सारी असे लाचलुचपत प्रतिबधक विभागातील गोपनीय कक्षात गेलो. तेथे उपस्थित पो.ह.क्र. 03-211 / मठपती यांची दोन्ही पंचांना व तक्रारदारांना ओळख करून दिली. त्यानंतर पो.ह. मठपती यांनी तांत्रिक विभागातील एक सोनी कंपनीचे डिजिटल व्हाॅईस रेकाॅ

ड

र, दोन नवीन सेल व एक सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एसडी कार्ड काढून माझे समक्ष पंचाना दाखविले. त्यातील डिजीटल व्हा

त्यानंतर मी सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी कार्ड पंचांना दाखविले असता ते 08 जीबी क्षमतेचे व त्यावरील

क्रमांक 2506DTEKV0CF असा असल्याचे दिसले. त्यानंतर मी सदर मायक्रो एस.डी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्ड
ड
रमध्ये टाकुन ते चालू करून तो पंचांना व तक्रारदार यांना वाजवुन दाखविले असता, नमूद मायक्रो एसडी कार्ड मध्ये देखील पु
श्री. मनोज हरिश्चद्र गोडसे यांचा दि. 20/08/2026 रोजीचा जबाब पुढे चालु......
त्यानंतर माझे सुचनेनुसार तक्रारदार शफीक अन्सारी यांनी त्यांचा वापरता मोबाईल क्र. 9307851182 वरून लोकसेवक पोलीस पवार यांचे मोबाईल क्र. 9821214340 व्हॉट्सअँप द्वारे व्हॉईस कॉल केला. लोकसेवक हे तक्रारदार यांना भेटावयास बोलावित असल्याचे त्यांचे संभाषणावरून समजले. परंतू नेटवर्क प्रॉब्लेममूळे त्यांचे व्यवस्थित व पूर्ण संभाषण होऊ शकले नाही. त्यानंतर मी, पो.ह मठपती यांचेसोबत डिजीटल व्हॉईस
रेकॉर्ड
ड
र मधील ध्वनीमुद्रीत संभाषण दोन्ही पंचांच्या समक्ष ऐकून सदर संभाषणाचे ट्रान्सस्क्रिप्ट पंचांच्या समक्ष तयार केले. सदरवेळी डिव्हीआर मधील एस.डी. कार्ड मध्ये संभाषणाच्या एकुण 04 फाईल्स तयार झाल्या होत्या. त्या सर्व फाईलची हॅशव्हॅल्यू काढून पंचनाम्यामध्ये नोंद घेतली आहे. त्यानंतर नमूद एस.डी. कार्ड एका खाकी रंगाच्या लिफाफ्यात ठेवून त्यावर पंचांच्या सहीचे लेबल लावून सिलबद केले. नमूद एस.डी कार्ड मी सपोआ ( तांत्रिक विभाग), लाप्रवि, मुंबई यांचेकडे दि. 19/08/2026 रोजीच जमा केले. त्यानंतर आम्ही दि. 20/08/2026 रोजी लोकसेवकाची पडताळणी करून पुढील कारवाई करण्याचे ठरविले.
दिंनाक 20/08/2026 रोजी मी, सपोआ बडगुजर तसेच दोन्ही पंच व सापळा पथक स.पो.फौ.क्र. 31087/पोळ, पो.ह 970654/पाडळे, पो.ह.क्र. 03712/गावडे, पो.ह.क्र. 03211/मठपती, पो.शि.क्र 092262/दराणे, पो. शि.181220/वाईगडे, चालक पो.शि.चा.क्र. 216321/चौरे, पो.शि.चा.क्र. 230463/पाटील असे पथक 02 शासकीय वाहनाद्वारे 09.00 वा. सापळा कार्यवाहीसाठी लागणारे आवश्यक ते सर्व साधन साहित्य तसेच दि. 19/08/2026 रोजी पडताळणी पंचनाम्या करीता वापरण्यात आलेले सिलबद मेमरी कार्ड इत्यादी साधन सामुग्रीसह 02 शासकीय वाहने व चालाकांसह रवाना झालो.
सापळा कारवाईचे पथक लाप्रवि कार्यालय येथून भिंवडी मधील मानसरोवर येथील इस्कॉन टेम्पलच्या बाजुला रस्त्यालगत येवुन थांबले. सदर ठिकाणी तक्रारदार शफीक अन्सारी हे देखील आल्यानंतर दि. 19/08/2026 रोजी तक्रारदार व लोकसेवक पवार यांचे मोबाईल फोनवर झालेले संभाषणाचे सिलबद एस.डी. कार्ड पंचांच्या समक्ष सील काढून एसडी कार्डचे व डीव्हीआर चे पुन्हा सविस्तर वर्णन घेवून सदरचे एसडी कार्ड डिव्हीआर मशीनमध्ये टाकून पाहीले असता, त्यामध्ये दि. 19/08/2026 रोजीचे संभाषणाचे 04 फाईल असल्याचे दिसून आले. सदरबाबत पंचांना व तक्रारदारास सविस्तर माहिती देवून सदर डिव्हीआर मधील एसडी कार्डमध्ये माझे, तक्रारदाराचे व पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक पवार यांस मोबाईल फोनवर कॉल करून त्यांची भेट घेण्याबाबत विचारणा करण्याचे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9307851182 वरुन लोकसेवक पवार यांचा मो.न. 9821214340 वर स्पिकर ऑन करुन व्हॉट्सअँप व्हाईस कॉल केला असता लोकसेवक पवार यांचा कॉल बिझी टोन लागला. त्यानंतर लगेच लोकसेवक पवार यांचे मोबाईल नंबर वरून तक्रारदार अन्सारी यांच्या मोबाईलवर व्हॉट्सअप कॉल आला असता मी तात्काळ डीव्हीआर ऑन केला तसेच तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी त्यांचे संभाषणादरम्यान लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांना भोईवाडा पोलीस ठाणे येथे भेटावयास बोलाविले.
लोकसेवक श्री. पवार यांना भेटण्याकरीता तक्रारदार यांच्यासह पंच क्र. 1, श्री. मयुर चौखंडे यांना पाठवायचे ठरल्याने मी त्या दोघांना लोकसेवकाच्या सोबत करावयाच्या संभाशणाच्या आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार शफिक अन्सारी यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बनियनला डीव्हीआर लावून ते चालू करून पंच श्री. चौखंडे यांच्यासोबत लोकसेवक यांना भेटण्याकरीता रवाना केले. काही वेळाने तक्रारदार व पंच श्री. चौखंडे हे आम्ही थांबुन होतो त्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पंच श्री. चौखंडे व त्यानंतर तक्रारदार शफिक यांना मी विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, ते दोघे मोटार सायकलने लोकसेवक श्री. पवार यांना भेटण्यासाठी भोईवाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे गेले असता तेथे लोकसेवक मिळून आले नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांनी लोकसेवक यांना फोनवर संपर्क करून लोकसेवकाच्या सांगण्याप्रमाणे ते पोलीस ठाणेच्या मागील बाजूस 'श्री रायमन हेअर ड्रेसर येथे श्री. पवार यांना जावून भेटले. त्या ठिकाणी तक्रारदार श्री. शफीक व लोकसेवक यांचे बोलणे झाले असता, लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांना 'हप्त्याला दोन वेळा गाडीबाबत' विचारणा केली त्यावर तक्रारदार

स्टेशन भिवंडी



Scanned with OKEN Scanner

यांनी सीनीअर साहेबांची रक्कम कमी करण्यास सांगितले असता, ''साहब के तीस में से कैसा कम करोंगे यार, मै मेरा कम कद दूंगा, साहब का कैसा करेगा?'' असे लोकसेवकाने बोलून नकार दिला. त्यावर तक्रारदार यांनी जास्त होत असल्याचे सांगितले असता, लोकसेवकाने ''दे पाच कम'' व ''इतना होयगा हि नही, इतना होयगा हि नही, मे तेरे को अभी, तु इतना प्यार व्यार मैं बोल दिया, मेैं साहब का पाच कम कर दिया, पच्चीस उनका पाच मेरा, बात क्लोज,'' असे बोलला.

त्यानंतर मी डिव्हीआर मधील लोकसेवक व तक्रारदार यांचे संभाषण दोन्ही पंचांच्या समक्ष लक्षपूर्वक ऐकले असता, लोकसेवक श्री. पवार हे तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करीत असल्याचे त्यांचे आपसातील संभाषणातून स्पष्ट झाले. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांना पुन्हा फोनवर संपर्क करून कारिवली पोलीस चौकी येथे येण्यास सांगितले. सदरचा फोन कॉल तक्रारदार यांचेकडून स्पीकरवर ठेवुन ध्वनीमुद्रीत करण्यात आला.

मी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर मी, तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये 30,000/- रक्कम असल्याचे सांगितले. मी सापळा पथकातील पो.ह. गावडे यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. 30,000/- (त्यामध्ये रू.500/- दराच्या भारतीय चलनाच्या 60 नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. सदर झेरॉक्स प्रतीवर दोन्ही पंचांची व माझी सही केली. त्यानंतर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांना अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यानंतर शासकीय वाहन चालक पो. शि. पाटील याचेमार्फतीने लाचेची रक्कम म्हणून वापरण्यात येणा-या रू.30,000/- या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार यांनी परिधान केलेली जीन्स पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवली तसेच पो.शि. पाटील हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले. तसेच सापळा कारवाई यशस्वी होताच त्याचे शासकीय मोबाईल फोनमध्ये व्हिडीओ शुटींग करण्याकरीता वापरण्यात येणारे मोबाईल फोनचे व वापरावयाचे एसडी कार्ड चे सविस्तर वर्णन पंचासमक्ष घेवून सदर मोबाईलमध्ये व्हिडीओ शुटींग करण्याकरीता पो.शि. 092262/दराणे यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या तसेच मोबाईलमध्ये शुटींग घेण्याच्या सुचना दिल्या. तसेच सापळा यशस्वी होताच पोह गावडे व पोह पाडळे हे तात्काळ लोकसेवक पवार यांचा हात पकडून अटकाव करतील तसेच इतर पथक हे आवश्यक ती उर्वरीत सर्व प्रक्रीया करतील अशा सर्वांना सुचना दिल्या.

श्री. मनोज हरिष्चद्र गोडसे यांचा दि. 20/08/2026 रोजीचा जबाब पुढे चालु......

त्यानंतर तक्रारदार व पंच श्री. चौखंडे यांना लाचेच्या रक्कमेसहीत तक्रारदार यांच्या मोटार सायकलने लोकसेवक श्री. पवार यांनी सांगितल्याप्रमाणे कारिवली पोलीस चैकी येथे रवाना केले. तत्पुर्वी लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानतर तक्रारदार हे त्यांच्या खिषातील हातरूमाल काढून त्यांचे तोंड पुसतील असा सापळा पथकास इशारा देण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी, सपोआ बडगुजर तसेच पंच क्र. 2, विरधवल जाधव व सापळा पथक असे वेगवेगळया ऑटो रिक्षाने तक्रारदार यांच्या वाहनाचे पाठोपाठ रवाना झालो. कारिवली पोलीस चौकी येथे पोहोचल्यावर सापळा पथकाने तक्रारदार दिसतील अशाप्रकारे थोडया अंतरावर रस्त्यावर थांबुन राहिले. त्यानंतर तक्रारदार व पंच श्री. चौखंडे हे लोकसेवक पवार यांची भेट घेण्याकरीता कारिवली चौकीच्या आत गेले तेव्हा लोकसेवक पवार हे त्या दोघांना चौकीच्या बाहेर घेवून आले आणि त्यांचे आपसांत बोलणे झाले. लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम स्विकारताच तक्रारदार यांनी ठरल्याप्रमाणे त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील रूमाल काढून त्यांचे तोंड पुसले. तक्रारदार यांच्याकडून लाच स्विकारल्याचा इशारा मिळताच पोह. गावडे व पोह पाडळे यांनी तात्काळ लोकसेवक पवार यांच्या दिशेने जावून पोह गावडे यांनी लोकसेवक पवार याचा डावा हात व पोह पाडळे यांनी उजवा हात पकडून लोकसेवकाचा इतर ठिकाणी स्पर्श होणार या प्रकारे त्यांना 15.40 वाजता अटकाव केला. तसेच सापळा पथकातील इतर अधिकारी, अंमलदार व पंच देखील त्या ठिकाणी तात्काळ आले. लोकसेवकास तेथे बाजुलाच असलेले कारिवली पोलीस चौकीमध्ये पुढील कारवाईकरीता नेले.

पोलीस चौकीच्या आतमध्ये इतर पोलीस अंमलदार देखील हजर होते. सफौ. पोळ यांना मी तेथे उपस्थित असलेले सर्व पोलीस अंमलदारांची माहिती नोंद करून घेण्यास सांगितले. तसेच मी ताब्यात घेतलेल्या लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव राजेंद्र कृष्णा पवार, वय 46 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पोहक्र. 3562, नेमणूक भोईवाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर व राहणार- रूम नं. 11 व रूम नं. 12, बिल्डींग नं. एल, जरी मरी पोलीस लाईन, सिव्हील हॉस्पीटल समोर, खारकर अळी, ठाणे पश्चिम, ठाणे 400601 असे सांगितले. त्यांच्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, आरोपी लोकसेवक राजेंद्र पवार यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी सोबत उपस्थित असलेले पंच श्री.



Scanned with OKEN Scanner

विरधवल जाधव यांना मी लोकसेवकाचे पॅन्टच्या खिशातील रक्कम काढून त्यांच्या ताब्यात घेण्यास सांगितले, त्याप्रमाणे पंच श्री. जाधव यांनी लोकसेवकाचे डाव्या पॅन्टच्या खिशातील लाचेची रक्कम काढून ती त्यांच्या ताब्यात घेतली. सदर ताब्यात घेतलेल्या नोटांचा क्रमांक सापळा पंचनामा दरम्यान तक्रारदार यांनी लाचेची रक्कम देण्याकरीता दिलेल्या नोटांचा क्रमांक एकच असल्याची खात्री केली.
कारिवली पोलीस चौकीमध्ये लाईट व दरवाजा बंद करून अंधार तयार करून पंचासमक्ष मी अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने लोकसेवक श्री. राजेंद्र पवार यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयाची तपासणी केली असता, लोकसेवक श्री. राजेंद पवार यांच्या डाव्या हाताच्या बोटांना व तळहातास तसेच त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या डाव्या खिशाच्या ता◌ो◌ंडाशी व खिशात फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. पंच श्री. जाधव यांनी लोकसेवक पवार यांच्या खिशातील लाचेची रक्कम काढुन स्वतःच्या ताब्यात घेतलेल्या लाचेच्या रक्कमेची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने तपासणी केली असता नोटांवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.
मी तक्रारदार श्री. शफीक अन्सारी व पंच श्री. चौखंडे यांना लोकसेवकास लाचेची रक्कम देताना काय बोलणी झाली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, लोकसेवक राजेंद्र पवार यांनी सांगितल्याप्रमाणे ते कारिवली चौकीमध्ये जावून त्यांनी लोकसेवक पवार यांना हाक मारली असता, ते त्या दोघांना चौकीच्या बाहेर घेवून आले. तक्रारदार यांनी त्यांच्या भंगारच्या गाडीस त्रास होणार नाही असे पवार यांना विचारले असता, '' नही होयेगा रे, मै बोला ना, सब लोग मेरे साथ में है, पकडे तो मेरे को फोन कर देना,'' असे बोलले. त्यानंतर शफीक अन्सारी याने लोकसेवकाला लाचेची रक्कम दिली असता, ''अरे दे दिया बात खल्लास, ये पैसे ए◌ैसा थोडी होये गिनने का? अरे पैसा काय का दे रहा है,? क्या बात कर रहा है ये? इसे में एक दो बार आता है ना, कितना टाईम लगता है खाली करने के लिये?'' तसेच ''बस, खाली करके निकल जाना, कुछ होयेगा तो मेरे को फोन कर देना कोई पकडेगा तो, मै बोल दूंगा'' असे संभाषण झाल्याची त्यांनी माहिती दिली. त्यानंतर मी डिव्हीआर मधील तक्रारदार व लोकसेवक यांचे झालेले संभाषण लक्षपूर्वक ऐकले असता लोकसेवक राजेंद्र पवार यांनी तक्रारदार यांना त्यांचा भंगार खरेदीविक्रीचा धंदा चालू राहू देण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. 35,000/- ची मागणी करून तडजोडअंती रू. 30,000/- लाचेची रक्कम स्विकारल्याची माझी खात्री झाली.
तरी आरोपी लोकसेवक श्री. राजेंद्र कृष्णा पवार, वय 46 वर्षे, पोह. 3562, नेमणूक- भोईवाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर यांनी तक्रारदार श्री. शफीक अन्सारी यांना भंगार खरेदीविक्रीचा व्यवसाय चालू ठेवण्याकरीता व त्यामध्ये कोणत्याही प्रकारे अडथळा येवू देणार नाही असे सांगुन तक्रारदार यांच्याकडे रू. 35,000/- ची मागणी करून तडजोडअंती रू. 30,000/- गैरफायदयाची रक्कम /लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ मिळून आले म्हणुन माझी लोकसेवक श्री. राजेंद्र कृष्णा पवार यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये फिर्याद आहे.
माझा जबाब मराठी भाषेत संगणकावर टंकलिखित केलेला असुन तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.
येथे श्री. पवार यांना जावून भेटले. त्या ठिकाणी तक्रारदार श्री. शफीक व लोकसेवक यांचे बोलणे झाले असता, लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांना 'हप्त्याला दोन वेळा गाडीबाबत' विचारणा केली त्यावर तक्रारदार यांनी सीनीअर साहेबांची रक्कम कमी करण्यास सांगितले असता, ''साहब के तीस में से कैसा कम करोंगे यार, मै मेरा कम कद दूंगा, साहब का कैसा करेगा?'' असे लोकसेवकाने बोलून नकार दिला. त्यावर तक्रारदार यांनी जास्त होत असल्याचे सांगितले असता, लोकसेवकाने ''दे पाच कम'' व ''इतना होयगा हि नही, इतना होयगा हि नही, मे तेरे को अभी, तु इतना प्यार व्यार मैं बोल दिया, मे◌ै साहब का पाच कम कर दिया, पचीस उनका पाच मेरा, बात क्लोज,'' असे बोलला.
त्यानंतर मी डिव्हीआर मधील लोकसेवक व तक्रारदार यांचे संभाषण दोन्ही पंचांच्या समक्ष लक्षपूर्वक ऐकले असता, लोकसेवक श्री. पवार हे तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करीत असल्याचे त्यांचे आपसातील संभाषणातून स्पष्ट झाले. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांना पुन्हा फोनवर संपर्क करून कारिवली पोलीस चौकी येथे येण्यास सांगितले. सदरचा फोन का◌ॅल तक्रारदार यांचेकडुन स्पीकरवर ठेवुन ध्वनीमुद्रीत करण्यात आला.
मी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर मी, तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये 30,000/- रक्कम असल्याचे सांगितले. मी सापळा पथकातील पो.ह. गावडे यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. 30,000/- (त्यामध्ये रू.500/- दराच्या भारतीय चलनाच्या 60 नोटा) यांच्या झेरा◌ॅक्स काढण्यात आल्या. सदर झेरा◌ॅक्स प्रतीवर दोन्ही पंचांची व माझी सही केली. त्यानंतर मी,



Scanned with OKEN Scanner

दोन्ही पंच व तक्रारदार यांना अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यानंतर शासकीय वाहन चालक पो. शि. पाटील याचेमार्फतीने लाचेची रक्कम म्हणून वापरण्यात येणा-या रू.30,000/- या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार यांनी परिधान केलेली जीन्स पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवली तसेच पो.शि. पाटील हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले. तसेच सापळा कारवाई यशस्वी होताच त्याचे शासकीय मोबाईल फोनमध्ये व्हिडीओ शुटींग करण्याकरीता वापरण्यात येणारे मोबाईल फोनचे व वापरावयाचे एसडी कार्ड चे सविस्तर वर्णन पंचासमक्ष घेवून सदर मोबाईलमध्ये व्हिडीओ शुटींग करण्याकरीता पो.शि. 092262/दराणे यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या तसेच मोबाईलमध्ये शुटींग घेण्याच्या सुचना दिल्या. तसेच सापळा यशस्वी होताच पोह गावडे व पोह पाडळे हे तात्काळ लोकसेवक पवार यांचा हात पकडून अटकाव करतील तसेच इतर पथक हे आवश्यक ती उर्वरीत सर्व प्रक्रीया करतील अशा सर्वांना सुचना दिल्या.

श्री. मनोज हरिंष्चद्र गोडसे यांचा दि. 20/08/2026 रोजीचा जबाब पुढे चालु......
त्यानंतर तक्रारदार व पंच श्री. चौखंडे यांना लाचेच्या रक्कमेसहीत तक्रारदार यांच्या मोटार सायकलने लोकसेवक श्री. पवार यांनी सांगितल्याप्रमाणे कारिवली पोलीस चैकी येथे रवाना केले. तत्पुर्वी लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विंकारल्यानतर तक्रारदार हे त्यांच्या खिषातील हातरुमाल काढून त्यांचे तोंड पुसतील असा सापळा पथकास इशारा देण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी, सपोआ बडगुजर तसेच पंच क्र. 2, विरधवल जाधव व सापळा पथक असे वेगवेगळया ऑटो रिक्षाने तक्रारदार यांच्या वाहनाचे पाठोपाठ रवाना झालो. कारिवली पोलीस चौकी येथे पोहोचल्यावर सापळा पथकाने तक्रारदार दिसतील अशाप्रकारे थोडया अंतरावर रस्त्यावर थांबुन राहिले. त्यानंतर तक्रारदार व पंच श्री. चौखंडे हे लोकसेवक पवार यांची भेट घेण्याकरीता कारिवली चौकीच्या आत गेले तेव्हा लोकसेवक पवार हे त्या दोघांना चौकीच्या बाहेर घेवून आले आणि त्यांचे आपसांत बोलणे झाले. लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम स्विकारताच तक्रारदार यांनी ठरल्याप्रमाणे त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील रुमाल काढून त्यांचे तोंड पुसले. तक्रारदार यांच्याकडून लाच स्विकारल्याचा इशारा मिळताच पोह. गावडे व पोह पाडळे यांनी तात्काळ लोकसेवक पवार यांच्या दिशेने जावून पोह गावडे यांनी लोकसेवक पवार याचा डावा हात व पोह पाडळे यांनी उजवा हात पकडून लोकसेवकाचा इतर ठिकाणी स्पर्श होणार या प्रकारे त्यांना 15.40 वाजता अटकाव केला. तसेच सापळा पथकातील इतर अधिकारी, अंमलदार व पंच देखील त्या ठिकाणी तात्काळ आले. लोकसेवकास तेथे बाजुलाच असलेले कारिवली पोलीस चौकीमध्ये पुढील कारवाईकरीता नेले.
पोलीस चौकीच्या आतमध्ये इतर पोलीस अंमलदार देखील हजर होते. सफौ. पोळ यांना मी तेथे उपस्थित असलेले सर्व पोलीस अंमलदारांची माहिती नोंद करून घेण्यास सांगितले. तसेच मी ताब्यात घेतलेल्या लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव राजेंद्र कृष्णा पवार, वय 46 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पोहक्र. 3562, नेमणूक भोईवाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर व राहणार- रूम नं. 11 व रूम नं. 12, बिल्डींग नं. एल, जरी मरी पोलीस लाईन, सिव्हील हाॅस्पीटल समोर, खारकर अळी, ठाणे पश्चिम, ठाणे 400601 असे सांगितले.
त्यांच्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, आरोपी लोकसेवक राजेंद्र पवार यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी सोबत उपस्थित असलेले पंच श्री. विरधवल जाधव यांना मी लोकसेवकाचे पॅन्टच्या खिशातील रक्कम काढून त्यांच्या ताब्यात घेण्यास सांगितले, त्याप्रमाणे पंच श्री. जाधव यांनी लोकसेवकाचे डाव्या पॅन्टच्या खिशातील लाचेची रक्कम काढून ती त्यांच्या ताब्यात घेतली. सदर ताब्यात घेतलेल्या नोटांचा क्रमांक सापळा पंचनामा दरम्यान तक्रारदार यांनी लाचेची रक्कम देण्याकरीता दिलेल्या नोटांचा क्रमांक एकच असल्याची खात्री केली.
कारिवली पोलीस चौकीमध्ये लाईट व दरवाजा बंद करून अंधार तयार करून पंचासमक्ष मी अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने लोकसेवक श्री. राजेंद्र पवार यांच्या हाताची व परिधान केलेल्या कपडयाची तपासणी केली असता, लोकसेवक श्री. राजेंद्र पवार यांच्या डाव्या हाताच्या बोटांना व तळहातास तसेच त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या डाव्या खिशाच्या ताोंडाशी व खिशात फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. पंच श्री. जाधव यांनी लोकसेवक पवार यांच्या खिशातील लाचेची रक्कम काढुन स्वतःच्या ताब्यात घेतलेल्या लाचेच्या रक्कमेची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या सहाय्याने तपासणी केली असता नोटांवर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.
मी तक्रारदार श्री. शफीक अन्सारी व पंच श्री. चौखंडे यांना लोकसेवकास लाचेची रक्कम देताना काय बोलणी झाली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, लोकसेवक राजेंद्र पवार यांनी सांगितल्याप्रमाणे ते कारिवली चौकीमध्ये जावून त्यांनी लोकसेवक पवार यांना हाक मारली असता, ते त्या दोघांना चौकीच्या बाहेर घेवून आले. तक्रारदार यांनी त्यांच्या भंगारच्या गाडीस त्रास होणार नाही असे पवार यांना विचारले असता, '' नही होयेगा रे, में बोला ना, सब लोग मेरे साथ में है, पकडे तो मेरे को फोन कर देना,'' असे बोलले. त्यानंतर शफीक अन्सारी याने



Scanned with OKEN Scanner

लोकसेवकाला लाचेची रक्कम दिली असता, ''अरे ते विश्वास बात खल्लास, मे पैसे एरोसा थोडी होये गिनने का? अरे पैसा काय का दे रहा है,? क्या बात कर रहा है मे? हो मे एक तो बार आता है ना, कितना टाईम लगता है खाली करने के लिये?'' तसेच ''बस, खाली करके निकल जाना, कुछ होगा तो मेरे को फोन कर देना कोई पकडेगा तो, मे बोल दूंगा'' असे संभाषण झाल्याची त्यांनी माहिती दिली. त्यानंतर मी डिव्हीआर मधील तक्रारदार व लोकसेवक यांचे झालेले संभाषण लक्षपूर्वक ऐकले असता लोकसेवक राजेंद्र पवार यांनी तक्रारदार यांना त्यांचा भंगार खरेदीविक्रीचा धंदा चालू राहू देण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. 35,000/- ची मागणी करून तडजोडअंती रू. 30,000/- लाचेची रक्कम स्विकारल्याची माझी खात्री झाली.

तरी आरोपी लोकसेवक श्री. राजेंद्र कृष्णा पवार, वय 46 वर्षे, पोह. 3562, नेमणूक- भोईवाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर यांनी तक्रारदार श्री. शफीक अन्सारी यांना भंगार खरेदीविक्रीचा व्यवसाय चालू ठेवण्याकरीता व त्यामध्ये कोणत्याही प्रकारे अडथळा येवू देणार नाही असे सांगुन तक्रारदार यांच्याकडे रू. 35,000/- ची मागणी करून तडजोडअंती रू. 30,000/- गैरफायदयाची रक्कम /लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ मिळून आले म्हणुन माझी लोकसेवक श्री. राजेंद्र कृष्णा पवार यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये फिर्याद आहे.

माझा जबाब मराठी भाषेत संगणकावर टंकलिखित केलेला असुन तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे नाव):**
navasu laxman fufane
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with OKEN Scanner

पोलीस ठाणे अंमलदार
भोईवाडा पोलीस ठाणे

Registered by (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सुवाक्षरी)

**Name (नाव):** vikram gulabrao mo
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

PI Manoj Godse

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner